<u>***राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक***</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :२७०/२०२४/नाशिक**

| **तक्रारदार** | **प्रतिवादी** |
|---|---|
| श्री. संपत वामन पवार,<br>रा.हिरेनगर, पो. हिसवळ बुद्रुक,<br>ता. नांदगाव, जि. नाशिक. | उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड,<br>उपविभाग मनमाड यांचे कार्यालय,<br>मनमाड, ता. नांदगाव, जि. नाशिक. |

<u>**सुनावणी दिनांक १९/११/२०२५**</u>

तक्रारदार यांनी दिनांक ०३/०५/२०२४ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १९/११/२०२५ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ०३/०५/२०२४ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी मला मी मागितलेली माहिती ही जशीच्या तशी दिलेली नाही, चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिलेली आहे व मला माहिती नाकारुन आरोपीस वाचविण्यात येत आहे. तसेच माहिती मोफत देण्यात यावी. व जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) चे उल्लंघन केल्याने २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्यात यावी व मला झालेल्या शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रासाबद्दल नुकसान भरपाई मिळावी.

३) तक्रारदार यांनी दि. २८/०२/२०२४ च्या माहिती अर्जान्वये " आपलेकडील पत्र जा. क्र. २०१/मा.अधि.क्र.१९८/५८११/२००२३ मनमाड उपविभाग मनमाड दि. २४/११/२०२३, दि. १५/०२/२०२३ रोजीचा तक्रार अर्ज मी आपल्या कार्यालयामध्ये दि. १५/०२/२०२३ रोजी वेळ- १६/४० वाजता अनुजाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ च्या कलमान्वये व भारतीय दंड संहितेमधील कलमान्वये गुन्हे दाखल करावे यासाठी लिखीत तक्रार दिली होती, त्याबाबत पुढील प्रमाणे मुद्देनिहाय माहिती मुद्दा क्रमांक (१) दि. १५/०२/२०२३ रोजीच्या गंभीर व दाखलपात्र गुन्ह्यासंबंधी नियमानुसार कारवाई करण्याची कालमर्यादा याची माहिती मिळावी., (२) संबंधीत गंभीर व दखलपात्र गुन्ह्यासंबंधी माझ्या तक्रारीवर कारवाई न करणाऱ्या जबाबदार अधिकारी कर्मचारी यांचे नाव व पदनाम याची माहिती मिळावी., (३) संबंधीत दि. १५/०२/२०२३ रोजीच्या गंभीर व दखलपात्र गुन्ह्याबाबत गुन्हा तात्काळ न दाखल करणाऱ्या जबाबदार अधिकारी कर्मचारी यांचेवर आपल्या विभागातील नियमानुसार होणाऱ्या कारवाई विषयी माहिती मिळावी. (४) अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ या कायद्याअन्वये लोकसेवकाचे कर्तव्य व २०१९ च्या सुप्रिम कोर्टाने दिलेले आदेश नंबरींगसह वरीलप्रमाणे १ ते ४ मुद्यांची माहिती आर. टी. आय. लोगोसह छायांकित साक्षांकित सत्य प्रतिमध्ये मिळावी व अर्ज प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत एकूण शुल्क व पाने ईमेलवर कळवावे.

४) सुनावणीवेळी प्रस्तुत प्रकरणी आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड उपविभाग मनमाड यांनी दि. २७/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १) अर्जदार यांनी आपले कार्यालयात लिखीत स्वरुपात दिनांक १५/०२/२०२३ रोजी केलेला तक्रारी अर्ज नांदगांव पोलीस ठाणे अभिलेखावर चौकशी कामी प्रलंबीत आहे. मुद्दा क्र. २) अर्जदार यांचे तक्रारी अर्जाची चौकशी सुरु असल्यामुळे गुन्हा दाखल नाही. सदर तक्रारी अर्जाची चौकशी सपोनि श्री. सुनिल बढे हे करत असून चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करीत आहोत., मुद्दा क्र. ३) अर्जदार यांचा तक्रारी अर्ज पोलीस ठाण्यात प्राप्त झाल्यानंतर तात्काळ चौकशी सुरु करण्यात आलेली असून अद्याप पावेतो चौकशी चालु सुरु आहे., मुद्दा क्र. ४) अनुसुचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ या कायद्या अन्वये लोकसेवकाचे कर्तव्य व २०१९ च्या सुप्रिम कोर्टाने दिलेले आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता ठेवली आहे. बाबत पी. पी. चौधरी सहा. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी अधिकारी नांदगाव, पोलीस ठाणे यांचा जा. क्र. ८९१/२०२४ दि. २३/०३/२०२४ रोजीची अहवाल (पानसंख्या ३) यासोबत जोडुन सादर केला आहे. असे वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थीस कळविले आहे. तसेच तक्रारदार यांनी तक्रारीचे कारण जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही जशीच्या तशी दिलेली नाही, चुकीची व दिशाभुल करणारी माहिती दिलेली आहे व मला माहिती नाकारुन आरोपीस वाचविण्यात येत आहे, असे नमुद केले आहे. परंतु तक्रारदार सुनावणीवेळी अनुपस्थित असल्याने कोणती माहिती चुकीची व दिशाभूल करणारी दिली याबाबत काहीही उलगडा झाला नाही. त्यामुळे तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक २७०/२०२४/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

**जावक क्र** ८३७६

12 DEC 2025